

शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

www.prahaar.in epaper.prahaar.in

बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ | मुंबई | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पुणे, नाशिक, अहिल्यानगर येथून एकाचवेळी प्रसिद्ध । वर्ष २३ । अंक ४७ । पाने १० । ₹ ५.००



वैभव सूर्यवंशीचे विश्वविक्रमी द्विशतक

◆ दोहा (वृत्तसंस्था) :

भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने मंगळवारी क्रिकेटविश्वात इतिहास घडवला. दोहा येथे सुरू असलेल्या 'एसीसी पुरुष आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६' स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध (यूएई) खेळताना वैभवने अवघ्या ५२ चेंडूंत द्विशतक झळकावण्याचा पराक्रम केला. लिस्ट-ए क्रिकेटमधील हे सर्वात वेगवान द्विशतक ठरले. त्याने ५३ चेंडूंत २८ षटकार आणि सात चौकारांच्या मदतीने २०४ धावांची वादळी खेळी केली. त्याच्या या खेळीच्या जोरावर भारताने २५० धावांचे लक्ष्य अवघ्या १४.२ षटकांत पार करत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

यूएईचा कर्णधार बासिल हमीद याच्या गोलंदाजीवर षटकार ठोकत वैभवने द्विशतक पूर्ण केले. यासह त्याने न्यूझीलंडच्या चाड बोवेसचा विक्रम मोडीत काढला. बोवेसने २०२४ मध्ये १०३ चेंडूंत द्विशतक झळकावले होते. वैभवने हा विक्रम तब्बल ५१ चेंडूंनी मागे टाकला. विशेष म्हणजे, द्विशतक पूर्ण केल्यानंतर पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. मात्र, तोपर्यंत त्याने सामन्याचे चित्रच पालटले होते.

विक्रमांची मालिका

- द्विशतकापूर्वी वैभवने अवघ्या २८ चेंडूंत शतक पूर्ण करत लिस्ट-ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतकाचाही विक्रम नोंदवला. त्याने ऑस्ट्रेलियाच्या जेक फ्रेझर-मॅकगर्कचा २९ चेंडूंत शतक झळकावण्याचा विक्रम मोडला. फ्रेझर-मॅकगर्कने २०२३-२४ मध्ये हा पराक्रम केला होता. दक्षिण आफ्रिकेचा एबी डिव्हिलियर्स ३१ चेंडूंत शतकासह या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.
- वैभवने १६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण करून आपल्या आक्रमक खेळीची सुरुवात केली. त्यानंतर चौकार आणि षटकारांची आतषबाजी सुरूच ठेवली. पहिल्याच षटकात तीन षटकार ठोकणाऱ्या वैभवने पुढील षटकांतही गोलंदाजांवर हल्ला चढवला. एका षटकात त्याने तब्बल ३० धावा वसूल केल्या, तर दुसऱ्या एका षटकात सलग चार षटकारांसह २८ धावा कुटल्या. त्याच्या फटकेबाजीसमोर यूएईचे गोलंदाज पूर्णपणे निष्प्रभ ठरले. या खेळीदरम्यान यूएईच्या क्षेत्ररक्षकांनी त्याला यष्टिचित करण्याची संधीही गमावली.
- **वैभवच्या २०४ धावांपैकी तब्बल १९६ धावा चौकार आणि षटकारांच्या माध्यमातून आल्या.**
- **त्याने एकूण २८ षटकार लगावण्याचा जागतिक विक्रमही केला.**
- **लिस्ट-ए क्रिकेटमध्ये वेगवान अर्धशतक, शतक, दीडशतक आणि द्विशतक झळकावण्याचा पराक्रमही त्याने या खेळीत केला.**

हरप्रीतच्या शतकामुळे यूएईच्या २४९ धावा

- तत्पूर्वी, दोहा येथील 'युनिव्हर्सिटी ऑफ दोहा फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी' मैदानावर झालेल्या ब गटातील या सामन्यात नाणेफेक जिंकून यूएईने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.
- भारताच्या हर्षित राणा आणि अर्शद खान यांनी सुरुवातीलाच धक्के दिल्याने सहा षटकांत यूएईची अवस्था दोन बाद २० अशी झाली होती. मात्र, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या ३५ वर्षीय हरप्रीत सिंग भाटियाने डाव सावरला.
- त्याने मुहम्मद शाहदादसोबत तिसऱ्या गड्यासाठी ७१ धावांची, तर इथन डिसोझासोबत चौथ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली. हरप्रीतने १२० चेंडूंत कारकिर्दीतील सातवे लिस्ट-ए शतक पूर्ण केले. त्याने १४४ चेंडूंत १२ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने १३० धावांची खेळी केली.
- ही त्याची कारकिर्दीतील सर्वोत्तम धावसंख्या ठरली. अखेरच्या षटकांत कर्णधार बासिल हमीदने नाबाद ३६ धावांची खेळी करत यूएईची धावसंख्या वाढवली.

कमाल ३४° किमान २५°

प्रतिलिटर, मुंबई शहरासाठी

आजचे इंधनाचे दर

इंधन	रुपये
साधे पेट्रोल	१११.२१
डिझेल	९७.८३

शेअर बाजार
सेन्सेक्स ८२,४३५.९९
निफ्टी २५,३४९.६५

वेचक

हसीना १६ डिसेंबरला मायदेशी परतणार

ढाका : बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांनी १६ डिसेंबर रोजी मायदेशी परतण्याची घोषणा केली आहे. बांगलादेशच्या विजय दिनाचे औचित्य साधून त्या ढाका येथे परतणार असल्याचे त्यांच्या प्रवक्त्यांनी सांगितले. भारतातून ढाक्यापर्यंतच्या प्रवासासाठी बांगलादेशची राष्ट्रीय विमान कंपनी 'बिमान बांगलादेश एअरलाइन्स'चे विशेष विमान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही त्यांनी बांगलादेश सरकारकडे केली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये देश सोडल्यानंतर मायदेशी परतण्याची निश्चित तारीख जाहीर करण्याची हसीना यांची ही पहिलीच वेळ आहे. शेख हसीना यांचे प्रवक्ते सय्यद मुझम्मेल अली यांनी त्यांच्या परतीची माहिती दिली.

नेपाळमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के

काठमांडू : नेपाळमध्ये मंगळवारी सकाळी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ५.३ इतकी नोंदवली. सकाळी ७ वाजून २ मिनिटांनी झालेल्या या भूकंपाचे हादरे भारत, भूतान आणि चीनमधील काही भागांतही जाणवले. त्यामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. युरोपियन-मेडिटेरेनियन भूकंपशास्त्र केंद्राच्या (ईएमएससी) माहितीनुसार, नेपाळमधील लेलेप परिसर हा भूकंपाचा केंद्रबिंदू होता. जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर भूकंपाचे धक्के निर्माण झाले.

व्हिएतनाममध्ये स्फोटात सहा ठार

हनोई : व्हिएतनामची राजधानी हनोई येथील एका उपाहारगृहात झालेल्या भीषण स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला, तर १४ हून अधिक जण जखमी झाले आहेत. गॅसगळतीमुळे हा स्फोट झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पहाटे झालेल्या या स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, आजूबाजूच्या घरांचे आणि इमारतींचेही नुकसान झाले. स्फोटामुळे परिसरातील घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या, भिंतींना तडे गेले, तर धातूची शटर्स चौकटीतून उखडली गेली. शेजारील अपार्टमेंट इमारतींनाही स्फोटाचे हादरे बसले.

जेन्सेन हुआंग यांच्याकडून चुकांची जाहीर कबुली!

पुनरागमनानंतर कर्मचाऱ्यांचा जल्लोष, एका दिवसात कंपनीच्या बाजारमूल्यात ९५२ अब्ज डॉलरची भर

◆ वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :

एनव्हीडियाचे सह-संस्थापक जेन्सन हुआंग सोमवारी कॅलिफोर्नियातील सांता क्लारा येथे असलेल्या कंपनीच्या मुख्यालयात परतले. कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांना पुन्हा एकदा अध्यक्ष आणि सीईओ म्हणून नियुक्त केल्यानंतर, कर्मचाऱ्यांनी जोरदार टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. एनव्हीडियाचे संशोधन उपाध्यक्ष मिंग-यू लिऊ यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडिओमध्ये, हुआंग कर्मचाऱ्यांना उद्देशून म्हणतात, की "या दुसऱ्या संधीबद्दल तुम्हा सर्वांचे आभार. या दुसऱ्या कार्यकाळात, मी अधिक चांगला सीईओ असल्याचे सिद्ध करीन."

चिप बनवणाऱ्या या कंपनीत घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर त्यांचे हे पुनरागमन झाले आहे. काही महिला कर्मचाऱ्यांशी असलेले कथित संबंध आणि चिनी हेर असल्याचा आरोप असलेल्या एका महिलेशी संबंधित प्रकरणांमुळे हुआंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. या आरोपांची चौकशी सुरू असून, ॲलिस हुआंग यांच्याशी असलेल्या कथित संबंधांबाबत कंपनी स्वतंत्र तपास करत आहे.

त्यांच्या पुनर्नियुक्तीची घोषणा करताना, एनव्हीडियाच्या संचालक मंडळाने सांगितले, की या प्रकरणाबाबत हुआंग यांनी दाखवलेल्या 'स्पष्टवक्तेपणा'बद्दल मंडळ समाधानी आहे. अमेरिकेच्या वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या अभिप्रायाचा हवाला देत, मंडळाने असेही स्पष्ट केले, की त्यांच्या परतण्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला कोणताही धोका निर्माण होत नाही. संचालक मंडळाचे अध्यक्ष हार्वे जोन्स यांनी सांगितले, की एनव्हीडियाचे नेतृत्व करण्यासाठी जेन्सेन हेच योग्य व्यक्ती आहेत. त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे कंपनीचे भागधारक, कर्मचारी, भागीदार आणि ग्राहक या सर्वांचे हित जपले जाईल.



माझ्या मध्यस्थीमुळेच हुआंग यांची पुन्हा नियुक्ती : ट्रम्प

- कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडीची कंपनी एनव्हीडियाच्या संचालक मंडळाने जेन्सन हुआंग यांची पुन्हा एकदा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय एकमताने घेण्यात आला. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या पुनर्नियुक्तीचे श्रेय स्वतःकडे घेतले आहे. आपण संचालक मंडळाशी चर्चा करून हुआंग यांना पुन्हा संधी देण्याचा सल्ला दिल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शेअर्समध्ये उसळी

१ हुआंग यांच्या पुनरागमनानंतर, एनव्हीडियाच्या शेअर्समध्ये आणि अमेरिकन शेअर बाजारात तेजी दिसून आली. एनव्हीडियाचे शेअर्स ३१.४८ टक्क्यांनी वधारले.

२ **२००३ नंतरची ही कंपनीची एका दिवसातील सर्वात मोठी वाढ असून, त्यांच्या इतिहासातील तिसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली. या तेजीमुळे एका दिवसात कंपनीच्या बाजारमूल्यात ९५२ अब्ज डॉलर्सची भर पडली.**

३ शेअर्स ३६.६ टक्क्यांपर्यंत वाढले होते;; मात्र नंतर नफावसुलीमुळे त्यात काहीशी घसरण झाली.

मदरसे दहशतवादी घडवणारे अड्डे!

मंत्री नितेश राणेंचा हल्लाबोल; मदरशांवर बंदीची मागणी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

कुर्ला येथे एका तरुण-तरुणीला झालेल्या मारहाणीच्या घटनेवरून राज्यभरात संताप व्यक्त होत असताना, राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मदरशांमधील शिक्षणपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. मदरशांमध्ये हिंदूविरोधी विचार शिकवले जात असल्याचा आरोप करत त्यांनी मदरसे बंद करण्याची मागणी केली. तसेच समान नागरी कायद्याला विरोध करणाऱ्यांना देशद्रोही संबोधत त्यांनी पाकिस्तान किंवा बांगलादेशात जाण्याचा सल्ला दिला.

माध्यमांशी बोलताना राणे म्हणाले, की मदरशांमध्ये हिंदूंचा द्वेष आणि धर्मांतराची शिकवण दिली जाते. या शिक्षणामुळेच काही जण बाहेर पडून अशा प्रकारच्या घटना घडवतात. मदरशांमधून डॉक्टर आणि अभियंते तयार होत नाहीत, तर ते दहशतवादाचे अड्डे बनले आहेत, असा आरोपही त्यांनी केला. मदरशांमध्ये सामान्य शाळांप्रमाणे शिक्षण दिले जाईपर्यंत कुर्ला आणि घाटकोपरसारख्या घटना थांबणार नाहीत, असेही ते म्हणाले.

देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसार एकच कायदा असायला हवा. एकाच देशात दोन वेगवेगळ्या कायद्यांची व्यवस्था कशासाठी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शरिया कायदा मानणाऱ्यांना देशात स्थान कशासाठी, असे विचारतानाच समान नागरी कायद्याला विरोध करणाऱ्यांवर त्यांनी टीका केली.

कुर्ला प्रकरणातील अल्पवयीन आरोपींबाबत बोलताना राणे यांनी त्यांना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. आरोपींना अल्पवयीन म्हणून संबोधण्यास त्यांनी आक्षेप घेतला. कोणाचा द्वेष करायचा, कोणावर दगड मारायचे, हे त्यांना माहीत आहे. आज दगड उचलणारे उद्या बॉम्बही उचलतील, असे म्हणत त्यांनी आरोपींना 'टिकिंग टाइम बॉम्ब' संबोधले. संबंधित दाम्पत्याला जीवे मारण्याच्या आणि गोळ्या घालण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा दावाही राणे यांनी केला. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आरोपींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. **(उद्याने कुणाच्या ताब्यात? : संपादकीय, पान ४)**

'यूसीसी'ला विरोध करणारे देशद्रोही

- समान नागरी कायद्याला काही समुदायांकडून होत असलेल्या विरोधाबाबत बोलताना मंत्री नितेश राणे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४४मध्ये समान नागरी कायदा लागू करण्यासाठी राज्याने प्रयत्न करावेत, असे नमूद आहे. त्यामुळे यूसीसीला विरोध करणारे देशद्रोही असून, ते शरिया कायदा आणि जिहादचे समर्थक आहेत, असा आरोप त्यांनी केला.



- **राज्यातील सरकार धर्मांतरविरोधी कायदा आणण्याच्या भूमिकेवर ठाम असून, त्यानुसार 'धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६' आणल्याचे राणे यांनी सांगितले. तसेच समान नागरी कायदा लागू करण्याची प्रक्रियाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली आहे. यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून, राज्यभर सर्वेक्षण सुरू आहे. डिसेंबरच्या विधिमंडळ अधिवेशनात समितीचा अहवाल सभागृहात मांडला जाईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.**
- हे सर्व निर्णय संविधानाच्या चौकटीत राहून घेतले जात असल्याचे सांगत, राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात अडचण येणार नाही, असा विश्वास राणे यांनी व्यक्त केला.

भिवंडीत शोरमा खाल्ल्याने १७ जणांना विषबाधा

'ए.के. शोरमा' दुकानावर पालिकेची तोडक कारवाई

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

भिवंडीतील वंजारपट्टी नाका परिसरात चिकन शोरमा खाल्ल्याने १७ जणांना विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. बाधितांमध्ये लहान मुलांसह एका गर्भवतीचा समावेश आहे. या घटनेनंतर भिवंडी महापालिकेने संबंधित 'ए. के. शोरमा' दुकानावर तोडक कारवाई करीत शोरमाची टपरी जप्त केली. निजामपूर पोलिसांनीही गुन्हा दाखल केला आहे.


वंजारपट्टी नाका परिसरातील या दुकानातून सोमवारी रात्री भोईवाडा आणि म्हाडा कॉलनी परिसरातील काही नागरिकांनी शोरमा खरेदी करून खाल्ला होता. त्यानंतर सुमारे तासाभरातच काहींना उलट्या, जुलाब आणि मळमळ होण्याचा त्रास सुरू झाला. मंगळवारी त्रास वाढल्याने १७ जणांना भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. बाधितांमध्ये लहान मुलांसह दोन महिन्यांची गर्भवती असलेल्या महिलेचाही समावेश आहे.

सात्यकी सावरकर यांच्याकडून सोनिया गांधींना नोटीस

'बिलॉंगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' पुस्तकातील सावरकरांविषयीच्या उल्लेखांवर आक्षेप

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

सोनिया गांधी यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'बिलॉंगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयीच्या उल्लेखांवर आक्षेप घेत सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी गांधी यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. पुस्तकातील काही मजकूर अवमानकारक आणि बदनामीकारक असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या नोटिशीला १५ दिवसांत उत्तर न दिल्यास न्यायालयात मानहानीची याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



सात्यकी सावरकर यांनी सोनिया गांधी यांच्या दिल्लीतील १० जनपथ येथील निवासस्थानी टपालाद्वारे नोटीस पाठवली असून, ईमेलद्वारेही ती बजावण्यात आली आहे. सात्यकी यांचे वकील संग्राम कोल्हटकर यांनी याबाबत माहिती दिली. पुस्तकाच्या पान क्रमांक २०१ आणि ४४३ वर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर असल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यसंग्रामात काँग्रेसचे कार्यकर्ते ब्रिटिशांच्या लाठ्या-काठ्या खात असताना सावरकर ब्रिटिशांसाठी हेरगिरी करत होते आणि त्यांनी ब्रिटिशांना मदत केली, असा उल्लेख पुस्तकात असल्याचा दावा नोटिशीत करण्यात आला आहे. तसेच भारतात हिंदू धर्म श्रेष्ठ असून अन्य धर्मीय कनिष्ठ आहेत, अशी भूमिका सावरकर यांची होती, असेही पुस्तकात नमूद केल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. या उल्लेखांमुळे सावरकर यांची प्रतिमा मलिन होत असल्याचे सात्यकी सावरकर यांचे म्हणणे आहे.

पेपरफुटीप्रकरणी १० कोटींचा दंड, १० वर्षांपर्यंत कारावास

उच्चस्तरीय समितीचा दुसरा अहवाल सादर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

भरती आणि स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी तसेच अन्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची शिफारस उच्चस्तरीय समितीने केली आहे. पेपरफुटी आणि संघटित गैरप्रकारांमध्ये सहभागी व्यक्ती व संस्थांना किमान १० कोटी रुपयांचा दंड आणि सात ते दहा वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद करण्याची सूचना समितीने आपल्या दुसऱ्या अहवालात केली आहे. त्याचबरोबर परीक्षेतील अनुचित साधनांचा वापर, गैरप्रकारांना मदत करणाऱ्या सेवा पुरवठादार संस्था आणि तपास प्रक्रियेबाबतही कठोर उपाय सुचवण्यात आले आहेत.

भरती आणि स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य सरकारने ४ सप्टेंबर २०२६ रोजी उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीचा दुसरा अहवाल २३ नोव्हेंबर रोजी शासनाला सादर करण्यात आला. त्यामध्ये पेपरफुटी आणि संघटित गैरप्रकार करणाऱ्यांविरोधात कठोर कायदा करण्याची शिफारस करण्यात आली आहे. संघटित गुन्हेगारीत सहभागी व्यक्ती आणि संस्थांना सात ते दहा वर्षांचा कारावास, किमान १० कोटी रुपयांचा दंड आणि संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची तरतूद सुचवण्यात आली आहे. परीक्षेत अनुचित साधनांचा वापर करणाऱ्यांना पाच ते दहा वर्षांचा कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंड करण्याची शिफारस आहे. गैरप्रकारात सहभागी असलेल्या सेवा पुरवठादार संस्थांना पाच कोटी रुपयांपर्यंत दंड आणि आठ वर्षांसाठी बंदी घालण्याची सूचना करण्यात आली आहे.

परीक्षा गैरप्रकारांचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत करण्याबरोबरच गंभीर प्रकरणांसाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची शिफारसही अहवालात आहे. अशा प्रकरणांमधील खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची सूचनाही समितीने केली आहे.



अहवालातील शिफारशी

- परीक्षा दिल्यानंतर उमेदवारांना संपूर्ण परीक्षा शुल्क परत करण्याची तरतूद सुचवण्यात आली आहे. उत्तरतालिकेवर उमेदवाराने घेतलेली हरकत योग्य ठरल्यास त्यासाठी भरलेले शुल्कही परत मिळणार आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यापर्यंत पुढील वर्षाचे वार्षिक परीक्षा वेळापत्रक जाहीर करावे, अशी सूचना करण्यात आली आहे.

एकमताने निवड; सोलापूरला चौथ्यांदा अध्यक्षपदाचा मान

शंभराव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळे

◆ सोलापूर (प्रतिनिधी) :

पुणे येथे जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची एकमताने निवड झाली आहे. या निवडीमुळे सोलापूरच्या साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान सोलापूरला चौथ्यांदा मिळाला आहे.

यापूर्वी १९९० मध्ये पुणे येथे झालेल्या ६३ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद यू. म. पठाण यांनी भूषविले होते. त्यानंतर २००० मध्ये बेळगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष य. दि. फडके होते. २००६ मध्ये सोलापूर येथे पार पडलेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक, निसर्गलेखक आणि 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांची निवड झाली होती. निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरणाचे मर्म उलगडणाऱ्या चित्तमपल्ली यांच्यानंतर आता सामाजिक वास्तवाचे भेदक चित्रण करणारे जागतिक कीर्तीचे साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या निवडीमुळे सोलापूरच्या साहित्यिक परंपरेचा गौरव पुन्हा एकदा उंचावला आहे. आता शंभराव्या संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. लिंबाळे यांची निवड झाल्याने सोलापूरच्या साहित्यिक परंपरेचा गौरव झाला आहे. डॉ. लिंबाळे यांनी आपल्या लेखनातून सामाजिक वास्तव, जातीय विषमता, अन्याय आणि शोषण यांवर परखड भाष्य केले आहे. वंचित, उपेक्षित आणि शोषित समाजाचे अनुभव, वेदना आणि संघर्ष त्यांनी विविध साहित्यप्रकारांतून प्रभावीपणे मांडले. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म १ जून १९५६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर येथे झाला. प्रतिकूल सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. जातीय विषमता, गरिबी आणि सामाजिक उपेक्षेचे अनुभव त्यांच्या लेखनाचा महत्त्वाचा आधार ठरले.



२८ जानेवारीपासून पुण्यात संमेलन

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. संमेलनाच्या शतकमहोत्सवी वर्षात अध्यक्षपदाचा बहुमान मिळाल्याने डॉ. लिंबाळे यांच्या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

बिस्लेरीची सर्व उत्पादने सुरक्षित

मुंबई : अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या स्पष्टीकरणाचे बिस्लेरी कंपनीने स्वागत केले आहे. जुन्या एका बॅचच्या तपासणीवरून कंपनीच्या सर्व उत्पादनांविषयी गैरसमज पसरवले जात असल्याचा दावा बिस्लेरीने केला आहे. कंपनीची सर्व उत्पादने सुरक्षित असून, ती निर्धारित निकषांनुसार तयार केली जात असल्याचे कंपनीने मंगळवारी प्रसिद्धिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

बिस्लेरीकडून दरवर्षी ५० हजारांहून अधिक उत्पादनांच्या बॅच तयार केल्या जातात. त्यापैकी गोवा प्रकल्पात २७ सप्टेंबर २०२५ रोजी उत्पादित झालेल्या 'जीओ २७०' या एकाच बॅचच्या विक्रीवर बंदीचा आदेश लागू असल्याचे कंपनीने म्हटले आहे.